# महाराष्ट्र विधानसभा

## <u>पत्रक भाग दोन</u>

## <u>गुरुवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ / फाल्गुन ५, १९४३ (शके)</u>

१८. <u>सदस्यांना अटक, अटकाव, स्थानबध्दता, सुटका इत्यादीबाबत</u>

मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांना पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांचेकडून कळविण्यात आले आहे की, श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू बाबाराव कडू, मा.राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेवर पोलीस स्टेशन आसेगाव पुर्णा येथे एन.सी.क्रमांक ४४६/२०२७ कलम १२५ (A) अ.लो.प्र.का. सहकलम १९९, २०० भारतीय दंड संहितेप्रमाणे अदखलपात्र गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा निकाल मा.दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चांदूर बाजार यांचेद्वारे दिनांक ११/०२/२०२२ रोजी देण्यात येऊन व त्यामध्ये श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू बाबाराव कडू यांना दोषी ठरविण्यात येऊन दोन महिने कारावास व २५,०००/- रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. त्याचवेळी मा.न्यायालयाद्वारे श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू बाबाराव कडू यांना जामीनावर मुक्त करण्यात येऊन त्यांना ३० दिवसाचे आत मा.वरिष्ठ न्यायालयात अपील करण्याची समज देण्यात आली आहे.

विधान भवन,<br>मुंबई,<br>दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२२

**राजेन्द्र भागवत**<br>प्रधान सचिव<br>महाराष्ट्र विधानसभा.

**<u>याची प्रत :</u>**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व संबधित सन्माननीय सदस्य.<br>
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.<br>
३. संगणक कक्ष (website.)